राखीव वनाचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन योजनेचा सन २०१९-२० करिता निधी वितरीत करण्याबाबत.. (४४०६-००५३).

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांक :- एस-१०/२०१९/प्र.क्र.३३६/फ-३
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २३ एप्रिल, २०१९.

वाचा :-

१) वित्त विभागाचे शासन परिपत्रक क्र. अंर्थसं-२०१७/प्र.क्र.४४/अर्थ-३, दि.१.०४.२०१९.
२) शासन निर्णय क्रमांक- एस-१०/२०१९/प्र.क्र.९१/फ-३, दिनांक २०.०४.२०१९
३) अपर प्रधान मुख्य वनंसरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) यांचे पत्र क्र.-कक्ष-१/पी/यो/नबाप्र/प्र.क्र.४२/००५३/५२/२०१९-२०, दिनांक २०.०४.२०१९.

प्रस्तावना :-

राज्य योजनेअंतर्गत सन २०१९-२० करिता राखीव वनांचे सर्व्हेक्षण, जमाबंदी व सिमांकन यासंदर्भात उपशिर्ष (४४०६-००५३) योजनांतर्गत एकूण रु.१०००.०० लक्ष इतका नियतव्यय अर्थसंकल्पित करण्यात आलेला आहे.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांनी सदर योजनेअंतर्गत संदर्भ क्र. २ अन्वये सदर योजनेअंतर्गत पुणे वन विभागातील वडगाव वनपरिक्षेत्रातील मौजे आतवण व पारवडी येथे वनजमिनीवर संरक्षित भिंत बांधण्यासाठी रु. ५९.३८ लक्ष तसेच ठाणे वन विभागातील मौजे इलाठाण व मौजे घणसोली येथे वनजमिनीवर संरक्षित भिंत बांधण्यासाठी एकूण रु. १७६.६८४ लक्ष असे एकूण रु. २३६.०६४ लक्ष रकमेचे अनुदान वितरीत करण्यासाठी शासनास विनंती केली आहे.

पुणे वन विभागांतर्गत पौड वनपरिक्षेत्रातील मौजे लोहगांव, कात्रज, डुडूळगांव, महंमदवाडी, वाघोली, केसनंद व हडपसर येथील वनक्षेत्राभोवती आर.सी.सी. संरक्षण भिंत बांधण्यासाठीच्या एकूण रु. ३,२४,५६,२०० /- च्या ८ अंदाजपत्रकास संदर्भ क्र. ३ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.

वित्त विभागाच्या दिनांक १.०४.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार, सन २०१९-२० मध्ये या योजनेसाठी अर्थसंकल्पित करण्यात आलेल्या रु. ४००.०० लक्ष निधी पैकी दिनांक १ एप्रिल, २०१९ ते ३१ जुलै, २०१९ या कालावधीतील खर्च भागविण्यासाठी सुपूर्द करण्यात आलेला रु. ३३३.३२ लक्ष इतका निधी वितरीत करण्याचे अधिकार प्रशासकीय विभागास प्रदान केले आहेत.

त्यानुसार अर्थसंकल्पित असलेल्या रु. १०००.०० लक्ष (०२ मजूरी- रु. १७०.०० लक्ष, लहान बांधकामे- रु. २१०.०० लक्ष व ५३ मोठे बांधकामे - रु. ६२०.०० लक्ष) निधी पैकी वितरणासाठी रु. ३३३.३२ लक्ष निधी उपलब्ध आहे.

प्रकरणी पुणे व ठाणे वन वृत्तांतर्गत उपरोक्त प्रस्तावित कामासाठी आवश्यक रु. ३१९.७४५ लक्ष इतका निधी सदर योजनेअंतर्गत वितरणासाठी उपलब्ध असलेल्या रु. ३३३.३२ लक्ष निधीतून वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन आहे.

शासन निर्णय:-

सन २०१९-२० करिता "राखीव वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन" (४४०६ ००५३) या योजनेअंतर्गत एकूण रु. १०००.०० लक्ष अर्थसंकल्पीत निधीच्या मर्यादेत प्रस्तावांतर्गत पुणे वनवृत्तांतर्गत मौजे आतवण, पारवडी, लोहगांव व डुडूळगांव येथील वनपरिक्षेत्रातील तसेच ठाणे वनवृत्तांतर्गत मौजे इलाठाण व मौजे घणसोली येथील वनक्षेत्रातील संरक्षण भिंत बांधण्याबाबतच्या कामासाठी आवश्यक **रु. ३,१९,७४,५००/-** (०२ मजूरी- रु. ५४,३५,६६५/- + २७ लहान बांधकामे रु. ६७,१४,६४५/- + ५३ मोठे बांधकामे रु. १,९८,२४,१९०/-) इतका निधी पुढील तपशिलानुसार तसेच अटींच्या अधीन राहून खर्च करण्यास मंजूरी देण्यात येत आहे :-

अ.क्र.	वनवृत्त	कामाचा तपशिल	वितरीत रक्कम
१	पुणे	वडगाव वनपरिक्षेत्रातील आतवण व पारवडी येथील वनक्षेत्राभोवती संरक्षण भिंत बांधणे.	रु. ५९,३८,०००/-
२		मौजे लोहगांव सर्व्हे क्र. ३०४ येथील आर.सी.सी संरक्षक भिंत बांधणे.	रु. ४१,८३,४००/-
३		मौजे डुडूळगांव सर्व्हे क्र. ११ येथील आर.सी.सी संरक्षक भिंत बांधणे.	रु. ४१,८४,७००/-
४	ठाणे	मौजे इलठाण सर्व्हे क्र. ७८/ब च्या हद्दीवर सलोह काँक्रिटची भिंत बांधणे.	रु. ७९,३६,९००/-
५		मौजे घणसोली सर्व्हे क्र. ५२२ च्या हद्दीवर सलोह काँक्रिटची भिंत बांधणे.	रु. ९७,३१,५००/-
		एकूण	रु. **३,१९,७४,५००/-**

१) ज्या प्रयोजनासाठी खर्चास मंजूरी देण्यात आली आहे, त्याच प्रयोजनावर निधी खर्च करण्यात यावा.
२) यामध्ये कोणत्याही प्रकारची वित्तिय अनियमितता होणार नाही, याची पुरेपूर दक्षता घेण्यात यावी.
३) वित्त विभागाने दिनांक ११/७/२००१ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या वित्तिय मर्यादा यापुढेही लागू राहतील.
४) सदर मान्यता ही सन २०१९-२० या कालावधी करिताच देण्यात येत आहे.

सदर खर्च हा मागणी क्रमांक- सी-१०, ४४०६ वनीकरण व वन्यजीवन यावरील भांडवली खर्च राज्य योजनांतर्गत योजना वनाचे सर्वेक्षण, जमाबंदी व सिमांकन (४४०६-००५३) या शीर्षाखाली दर्शविण्यात यावा व सन २०१९-२० मध्ये मंजूर अर्थसंकल्पित अनुदानातून भागविण्यात यावा. निधी खर्च करताना वित्त विभागाने मासिक निधी विवरणपत्र तसेच इतर बाबतीत दिलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या दिनांक १.०४.२०१९ रोजीचे परिपत्रक आणि वित्त विभागाचा शासन निर्णय क्रमांक वि.अ.प्र.-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम/भाग-२, दिनांक १७/४/२०१५ भाग पहिला उप विभाग-३ परिच्छेद २७ (२) अन्वये विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारास अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१९०४२३१७०९४१४०१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Pandurang Pandhare

Digitally signed by Sunil Pandurang Pandhare
DN: CN = Sunil Pandurang Pandhare, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue and Forest Department
Date: 2019.04.23 17:17:20 +05'30'

(सुनिल पांढरे)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

<u>प्रत :-</u>

१) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर.
२) प्रधान मुख्य वनसंरक्षक (अर्थसंकल्प, नियोजन व विकास) महाराष्ट्र राज्य, नागपूर.
३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (संधारण) महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), ठाणे /पुणे.
५) मुख्य वनसंरक्षक (भूमी अभिलेख कक्ष), नागपूर.
६) उप वनसंरक्षक, ठाणे / पुणे
७) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता/ लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई / नागपूर.
८) नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
९) वित्त विभाग, व्यय १०/ अर्थसं-४ मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
१०) कार्यासन अधिकारी (फ-२) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
११) कार्यासन अधिकारी, ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
१२) निवडनस्ती, कार्यासन (फ-३), म.व.व.वि., मंत्रालय, मुंबई-३२.